IMPACT FACTOR - 3.47
ISSN 2349-1027
Indo Western Researchers (IWR)
Issue : IX, Vol. VII
Aug. 2017 To Jan. 2018
www.irasg.com



# मानवी हक्क आणि बिगर शासकिय संस्था

एन. एस. सोमगोंडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
जवाहर महाविद्यालय,
अनदुर, जि, उस्मानाबाद (महाराष्ट्र) भारत

**प्रास्ताविक :-**

अधुनिक लोकशाही व्यवस्थेथ नागरिकांच्या कल्याणाची जबाबदारी ही राज्य संस्था आणि तिच्या विविध संस्थावर असते. आज राज्य संस्था कल्याणकारी भूमिकेतून बाहेर पडत असली तरी तिथे निर्वात पोकळी निर्माण झालेली आहे. राज्यसंस्थेची कल्याणकारी भूमिका बिगर संस्थेची शासकीय व स्वयंसेवी संस्थांनी जबाबदारी स्वीकारली आहे. त्यांची बांधिलकी, विश्वासार्हता , व्यापकता आणि गुणवत्ता याबाबत बरीच भिन्न व विरोधी मतांतरे असली तरी कल्याणकारी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीतील त्यांचे स्थान व महत्व दुर्लक्षित करण्यासारखे नाही.

स्वयंसेवी संघटनाकडे अधिकारशाहीहीन , बांधिलकी प्रसृत करणा-या आणि संघटनेच्या सदस्यांना आदर्श मूल्यांनी एकत्र ठेवणा-या संघटना म्हणून पाहिले जाते. स्वयंसेवीत्व म्हणजे समुदायाच्या हितासाठी हस्तक्षेप करणा-या व्यक्ती व समुदायाचे हे असे चैतन्य असते, जे तिच्या वाढीच्या प्रत्येक टप्यावर मानवी सभ्यतेला आकार देण्यात महत्वाची भूमिका पार पाडत असते. स्वयंसेवी संस्था म्हणजे स्वयंसेवी स्वायत्त, नफाभिमुख नसलेली संघटना, समाजातील विविध समस्या , विषय व विषमतांना वाचा फोडणा-या नागरिकांचा गट होय. अशा संघटनांचे सदस्य, कर्मचारी हे वेतन व वेतनाशिवाय आणि विस्तृत नियंत्रणाशिवाय कार्यरत असतात. तसेच या संस्थेमध्ये जबाबदारीच्या वाटपासह सामूहिक कृती केली जाते आणि सदस्यांवर वित्तीय जाबाबदारीची अमर्याद असा ताण नसतो. कोणत्याही बाह्य नियंत्रण व दडपणाशिवाय कार्य करणारी ही संघटना असते.

**उद्देश -**

१) स्वयंसेवी संस्थांच्या कल्याणकारी कार्याचा अभ्यास करणे

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Anadur Tq. Tuljapur Dist. Osmanabad



123

२) स्वयंसेवी संस्थांची रचना आणि भूमिकांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-**

संबंधित संशोधन हे द्वितीयक साधनांचा व मानवी हक्कावरील ग्रंथाचा वापर केला आहे.

**मर्यादा :-**

स्वयंसेवी संस्था रचना, भूमिका, व कार्य यापुरतीच मर्यादित आहे.

**बिगर -शासकीय संस्थांची भूमिका**

१९९३ साली ऑस्ट्रेलियातील व्हियन्ना येथे 'मानवी हक्कांवर जागतिक परीषद ' पार पडली या परिषदेचा उद्देश म्हणजे मानवी हक्काच्या क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा घेणे आणि मूल्यमापन करणे होय. या घोषणापत्रातील ठराव क्रं.३८ नुसार मानवी हक्कांवरील जागतिक परिषदेत सर्व प्रकारच्या मानवी हक्क आणि मानवतावादाच्या संवर्धनातील बिगर-शासकीय संस्थांच्या भूमिकेचे महत्व अधोरेखित केले आहे. संयुक्त राष्ट्राचे माजी महासचिव कोफी अन्नान यांच्या मते, " २१ वे शतक हे एनजीओंचे शतक असेल."

सामाजिक कल्याणाची भूमिका - या अंतर्गत रिलिफ आणि चॉरिटी या महत्वाच्या कृती आहेत. या भूमिकेत एनजीओ अंतर्गत कार्यक्रम आणि प्रकल्पांमध्ये पुढाकारा घेतात.

मध्यस्थांची भूमिका - विकास आणि सामाजिक कृतीकरीता संप्रेषण कौशल्य महत्वाचे असते. तेव्हा एनजीओ स्थानिक लोक ते अधिकारी, प्रतिनिधी व सवांदाच्या विभिन्न पातळयांवर मध्यस्थीची भूमिका बजावते.

सल्लागारात्मक भूमिका - समर्थनाचे दस्तऐवजीकरण माहिती प्रसार आणि तज्ञ फार महत्वाची असते. तेव्हा सल्लागारात्मक भूमिका प्रमुख ठरते. अशावेळी स्थानिक पातळीवरील तज्ञ / व्यावसायिक / मार्गदर्शक व्यक्ती महत्वाची भूमिक बजावतात.

पायाभूत सुविधांचा विकास - समुदायाधारित संघटना आणि सहकारी संस्था जमीन प्राप्त , विभाजित आणि विकसित करू शकतात, ग्रहनिर्माण करू शकतात, पायाभूत सुविधा पुरवू शकतात त्यांच्याबरोबर विहरी, सार्वजनिक शौचालये, घनकचरा गोळा करणे इत्यादी बाबींचा कार्यचलन करू शकतात.

नाविन्यपूर्णता, प्रदर्शन आणि पथदर्शी प्रकल्प :-एनजीओंना काही विशिष्ट ठिकाणांची निवड करून नाविन्यपूर्ण प्रकल्प त्यांना योग्य वाटेल त्या कालावधीपर्यंत सुरू ठेवता येतो.

**संप्रेषण सुलभ करणे -**

शासनाच्या संदर्भात एनजीओंची भूमिका म्हणजे त्या शासनाच्या धोरणनिर्मिती पातळीवर संवाद साधू शकतात. स्थानिक पातळीवरील लोकांच्या क्षमता, दृष्टिकोन , सांस्कृतिक -वैशिष्ट्यांबाबतची व्यवस्थित मांडणी करू शकतात. एनजीओ जनता ते शासन आणि शासन ते जनता असा संवाद सुलभ करू शकतात.

**तांत्रिक सहकार्य आणि प्रशिक्षण -**

एनजीओ आणि प्रशिक्षण संस्था जनतेबरोबर शासकीय अधिकाऱ्यांना तांत्रिक सहकार्य आणि



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

124

प्रशिक्षण पुरवितात.

**संशोधन, पर्यवेक्षण आणि मूल्यमान -**

बहुसंख्या एनजीओज काही महत्वाच्या सामाजिक प्रश्नांवर संशोधन योजना व प्रकल्पाच्या **पर्यवेक्षण आणि मूल्यमान या विविध टप्यांवर कार्यरत असलेल्या दिसतात.**

**भारतातील बिगर-शासकीय संस्थांची वाटचाल -**

भारताच्या संदर्भात विकास कार्यामध्ये एनजीओंची भूमिका मध्यवर्ती राहिलेली दिसते. तथापि हा प्रश्न आजही अनुत्तरीतच आहे की ही भूमिका कोणती आहे \ हा प्रश्न नवीन नाही. शासन त्यांच्याकडे 'सेवा पुरवठादार ' या दृष्टिकोणातून पाहते तर एनजीओंचे समर्थन स्वत:कडे 'सामाजिक बदालाची जनवकालत करणारे ' या दृष्टिकोनातून पाहते. भारतीय एनजीओज गेल्या १०० वर्षापासून कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या विकास कार्यामध्ये सहभागी आहेत आणि भारतीय शासनाच्या कार्यक्रमामध्ये महत्वपूर्ण राहिल्या आहेत. त्याचबरोबर १९४७ सालापासून आंतरराष्ट्रीय एनजीओदात्यांसोबत भागीदारी राहिल्या आहेत.

**एनजीओज् आणि समुदाय विकास -**

२००० दशकाच्या सुरूवातीला भारतीय एनजीओपुढे संधी आणि आव्हाने उभी राहिली. एनजीओंना स्वत: पुढाकार घेऊन समुदाय विकासाच्या कार्यक्रम आणि सक्षमीकरणामध्ये परिणामकारक भूमिका बजावण्याची संधी निर्माण झाली. १९९२ सालच्या पंचायत राज कायद्यांतर्गत स्थानिक पातळीवर बहुसंख्य एनजीओ स्थापन झाल्या. याशियाव स्थानिक शासनाच्या अर्थसंकल्प आणि विभिन्न कृतींची जबाबदारी वाढली. उदा. पाणीपुरवठा, रस्ते, सोयीसुविधा आणि व्यापक्त विकासलक्षी कार्यक्रम वगैरे. यामुळे एनजीओसाठी संधी निर्माण झाली की त्यांनी केवळ सेवा पुरवठादार असण्याऐवजी या प्रक्रियेचे पर्यवेक्षण आणि मध्यस्थ म्हणून भूमिका पार पाडावी आणि त्यांच्या सक्षमीकरणाच्या कार्यक्रमाद्वारे स्थानिक पातळीवरील सत्ता राजकारण यातील सुलभकर्ता म्हणून काम करावे.

**निष्कर्ष :-**

बिगर शासकीय संस्था आज जनतेच्या कल्याणाच्या आणि सुविधा पुरवण्याचे काम करीत आहेत. एनजीओ मोठया प्रमाणात नागरिकांच्या आरोग्य, स्वच्छता, वैद्यकीय सुविधा आणि मूलभूत सुविधांच्या बाबतीत जनजागृती आणि मदत करीत आहेत. एनजीओ शासनाच्या दडपणापासून व नियंत्रणापासून मुक्त आहेत. त्यामुळे देशाच्या विकास कार्यात त्यांचा फार मोठा योगदान आहे.

## संदर्भ सूची :-


१) मानवी हक्क - तुकाराम जाधव, महेश शिरापूरकर

२) मानवी हक्क जबाबदा-या व कायदे - प्रा.चंद्रकांत मिसाळ

३) मानवी हक्कावरील इतर ग्रंथे




Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad